ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 9 | Issue - 8 | APRIL - 2023

Historicity researcH Journal

# हरितक्रांती यश / अपयश
## राष्ट्रीय परिषद



प्रा. माने आर. व्ही.
अर्थशास्त्र् विभाग, दे.सं.गरड महाविदयालय, मोहोळ.

### प्रास्ताविक -

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. सर्वप्रथम उत्तर अमेरिकेतील मेवसीको या शहरात हरितक्रांती झाली. भारतात हरितक्रांती 1967-68 मध्ये घडून आली. पूर्वीची पारंपारिक शेती ही उत्पादन वाढीच्या दृष्टीने फायदेशीर ठरत नव्हती. अश्या परिस्थितीत जूनी पारंपारिक शेती सोडून अत्याधुनिक पध्दतीने शेती कशी करता येईल. हा संदेश शेतकऱ्यांना हरितक्रांतीने दिला.

### उददीष्टये -

1. शेती उत्पादन वाढवणे.
2. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणेृ
3. शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ घडवून आणणे.
4. शेती विषयक संशोधनास प्रोत्साहन देणे.
5. पिकाच्या आकृतीबंधात बदल घडवून आणणे.

### व्याख्या -

शेती करण्याच्या जुन्या पारंपारिक पध्दतीचा त्याग करुन त्याऐवजी अत्याधुनिक तंत्राचा अवलंब करुन शेती उत्पादन वाढविणे याला हरितक्रांती असे म्हणतात.

थोडक्यात शेतीच्या उत्पादनात आश्चर्यकारक वाढ घडवून आणणे म्हणजे हरितक्रांती होय.

शेती उत्पादन वाढविण्यासाठी अत्याधुनिक बी-बियाणाचा अवलंब करण्यात आला. उदा. ज्वारीमध्ये मालदांडी, गव्हामध्ये कल्याणसोना, बाजरीमध्ये बाजरा एच.एम. कापसामध्ये वरलक्ष्मी, जे-34 इ. अत्याधुनिक बी-बियाणे शेतीमध्ये वापरुन शेतीचे उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले.

**रासायनिक खते -** युरिया, सुफला, जय जवान जय किसान याशिवाय पाण्यात विरघळणारी फॉस्फेट, अमोनिया ही खते वापरल्यामुळे जी पिके एकवर्षात येत होती ती सहा महिन्यात येऊ लागली.

शेती उत्पादन वाढविण्यासाठी नवनविन तंत्रज्ञानाचा, बी-बियाणे याचा वापर करुन शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी पाणीपूरवठयाची गरज होती. विशेषत: धरणे, कालवे, पाटबंधारे, विहिरी यामुळे शेतीचे उत्पादन वाढणार होते.

शेती संशोधनाला चालना देण्याच्या दृष्टीने कृषी विदयापीठे शेती संशोधन मंडळे यांची निर्मिती करण्यात आली. यामधून शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने चालना मिळणार होती. दर्जेदार बियाणे, जमिनीचे वेगवेगळे प्रकार, हवामान या दृष्टीने वेळोवेळी शेतीमध्ये कोणती पिके घेण्यात यावी याबाबत संशोधन करण्यात आले.

याशिवाय शेतमालाला हमी भाव, पतपूरवठयाच्या सोई उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यामुळे शेती उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले.

## निष्कर्ष / फायदे -

1. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनला.
2. मजूरीच्या दरात वाढ - शेतमजूर, असंघटीत कामगारांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला.
3. शेतीपूरक व्यवसाय निर्माण झाले. उदा. कुक्कुटपालन, शेळीमेंढी पालन, दुग्धव्यवसाय इ.
4. शेतीमध्ये गुंतवणूक वाढली - शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. बागायती पिके घेण्यात आली. उदा. ऊस, कापूस, तंबाखू, त्यामुळे उत्पन्न वाढून वाढलेले उत्पन्न पून्हा शेतीत गुंतवले गेले. त्यामुळे शेती हा एक मोठा उदयोग आहे ही मनसिकता शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली.
5. उदयोगधंदे वाढले - साखर कारखाने, सुतगिरण्या, तेलगिरण्या इ. यामुळे देशाच्या औदोगिकीकरणाला चालना मिळाली.

## तोटे -

1. श्रीमंत शेतकऱ्यांचा फायदा.
2. शेतीत भांडवलशाही वाढली.
3. उत्पन्नात विषमता वाढली.
4. प्रादेशिक विषमता वाढली.
5. बेकारीत वाढ झाली.

## समारोप -

हरितक्रांतीमुळे भारताच्या अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. हे हरितक्रांतीचे यश म्हणता येईल.

## संदर्भ -

1. प्रा. भारतीय अर्थव्यवस्था - दत्त सुंदरम
2. Agricultural Economics - एस सुब्बारेडी, आर. रघुराम.